# University of Mumbai

No. 2026MAYFMTS00045

**परिपत्रक :—**

मुंबई विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, औषधशास्त्र, वास्तुशास्त्र, अभियांत्रिक व विधी महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुरस्थ व ऑनलाईन शिक्षण केंद्र संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांकरीता विद्यापीठ परीक्षा विभागाच्या नियंत्रण कक्षाकडून D.E.P.D.S प्रणालीद्वारे प्रश्नपत्रिका पाठविल्या जातात. परिपत्रकाद्वारे संबंधीत महाविद्यालयातील परीक्षा केंद्रानी खालील बाबींची दखल घेवून पुर्तता करावी:

१. D.E.P.D.S. प्रणालीसाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असावे व नियंत्रण कक्षामध्ये परीक्षेसंबंध कामकाजाव्यतिरिक्त इतर कोणतीही कामे करू नयेत.
२. संगणकाच्या मागील बाजुस सी.सी.टिव्ही कॅमेरा बसविण्यात यावा जेणेकरून संगणकावर कोणत्या स्वरूपाचे काम चालू आहे याची नोंद ठेवली जाईल.
३. परीक्षा संपुष्टात आल्यानंतर कमीत कमी **तीन** महिन्यांची सी.सी. टिव्ही कॅमेरामधील संचलित माहितीची (Backup) नोंद विद्यापीठाच्या हस्तलिखीते कक्षास वेळोवेळी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.
४. विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका वितरीत करतेवेळी आसन व्यवस्थेनुसार परीक्षा नियंत्रण कक्षामध्येच प्रश्नपत्रिका मोहरबंद (Seal) लिफाफ्यावर किमान एक विद्यार्थी आणि परीक्षागृहात नियुक्त करण्यात आलेल्या पर्यवेक्षकाची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे.
५. परीक्षा नियंत्रण कक्षात फक्त अधिकृत व्यक्तीला प्रवेश देण्यात यावा.
६. परीक्षागृहात ये—जा करण्याऱ्या प्रत्येक व्यक्तीची कृती नोंदवहीमध्ये (Log Book) नोंद करणे बंधनकारक आहे. तसेच परीक्षा नियंत्रण कक्षाच्या खिडक्या जाळीने आच्छादित करण्यात याव्यात.
७. परीक्षा नियंत्रण कक्षात स्वतंत्र दुरध्वनी संच उपलब्ध असावा. जेणेकरून त्याचा उपयोग आकस्मिक निकडीच्या (Emergency) वेळी करणे शक्य होईल.
८. संगणकाला प्रिंटर जोडलेले असणे आवश्यक आहे. जेणेकरून प्रश्नपत्रिकेची प्रिंट नियंत्रण कक्षामध्येच घेता येईल.
९. झेरॉक्स मशीन नियंत्रण कक्षात उपलब्ध असावी. झेरॉक्स मशीन वायरशी जोडण्यात यावी आणि त्याचा Access अन्य ठिकाणी देण्यात येवू नये.
१०. नोंदणीकृत व्यक्तीचे छायाचित्र दाखवून अनाधिकृत व्यक्तीने प्रश्नपत्रिका डाउनलोड करण्याचा प्रयत्न केल्यास तो अक्षम्य गुन्हा मानण्यात येईल.
११. परीक्षागृहामध्ये अधिकृत पर्यवेक्षकाने प्रवेशपत्रावरती दर्शविलेल्या विषय सांकेतांकनुसार (Paper Code) विद्यार्थ्यांनां प्रश्नपत्रिका वितरीत करताना योग्य ती काळजी घेण्यात यावी.
१२. विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांमध्ये परीक्षा नियंत्रण कक्षाची (Control Room) विद्यापीठ नियुक्त समिती कार्यालयीन वेळेत अचानक प्रत्यक्ष पहाणी करू शकते याची नोंद घ्यावी.

२/—

१३.नियंत्रण कक्षात D.E.P.D.S. प्रणालीसाठी स्वतंत्र संगणक असावा. संगणकामध्ये D.E.P.D.S. प्रणाली व्यतिरिक्त इतर कोणतेही सॉफ्टवेअर किंवा डेटा नसावा. संगणकामध्ये Windows 10 किंवा अधिक असावा. लॅपटॉपचा वापर करण्यात येऊ नये.

१४. विद्यापीठामार्फत आपल्या महाविद्यालयासाठी Joint Chief Conductor ची नियुक्ती करण्यात आली असल्यास त्यांना सहकार्य करावे.

संगणकाची तपशील प्रणाली (Specifications) 'Annexure 1' प्रमाणे असावी.

## Annexure 1

**1. Processor**
- Intel Core i5 (10th Gen or higher) / AMD Ryzen 5 or above
- Minimum 4 cores, 2.5 GHz+ clock speed
- Virtualization enabled (for container/VM compatibility if required)

**2. Memory (RAM)**
- Minimum: **4 GB DDR4**
- Recommended: **8 GB DDR4** (for faster decryption, downloads, and multitasking)

**3. Storage**
- **SSD (Solid State Drive)** – 256 GB minimum
- Recommended: 512 GB NVMe SSD (for speed and reliability)

**4. Operating System**
- Windows 10 Pro / Windows 11 Pro

**5. Network**
- Gigabit Ethernet (LAN mandatory; Wi-Fi not recommended)
- Static IP or restricted IP pool for downloads

**6. Security Hardware**
- **Devices** (Face recognition camera)
- **2FA-enabled system** (linked with registered mobile/email)
- USB ports **disabled or locked** to prevent unauthorized data transfer

**7. Display & Peripherals**
- 14" or larger monitor
- Secure thermal/laser **printer** with direct USB/Ethernet connection (no Wi-Fi printing)
- UPS with **30–60 minutes backup** to cover power outages

**8. Other Requirements**
- **No external storage** (USB/CD/DVD) allowed
- **Dedicated room PC** – not to be shared for general admin/college work

**आपणांस याद्वारे सुचित करण्यात येते की, प्रचलित पध्दतीनुसार परीक्षा सुरू झाल्याच्या अर्ध्यातासानंतर विद्यार्थीना पेपर संपवुन परीक्षागृहाबाहेर जाण्याची परवानगी होती. त्याऐवजी आता परीक्षा सुरू झाल्याच्या एक तासानंतरच विद्यार्थ्यांना परीक्षागृहाबाहेर जाण्याची परवानगी देण्यात यावी किंवा अर्ध्यातासानंतर विद्यार्थ्यांना परीक्षा गृहातुन बाहेर जावयाचे असल्यास सदर विद्यार्थ्यांकडुन उत्तरपत्रिकेसह प्रश्नपत्रिका पर्यवेक्षकाकडे जमा करून घ्यावी जेणेकरून सदर प्रश्नपत्रिका सोशल मिडियाद्वारे कोणालाही संदेशीत करता येणार नाही.**

३/—

# University of Mumbai



महाविद्यालयांच्या परीक्षा केंद्राद्वारे परीक्षेदरम्यान कोणत्याही स्वरूपाचा गैरप्रकार घडल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची पुर्ण जबाबदारी महाविद्यालयांचे प्राचार्य/परीक्षा केंद्रप्रमुख (Chief Conductor) यांची असेल याची नोंद घ्यावी.

मुंबई ४०००९८.
दिनांक १८/०५/२०२६

संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

प्रति,

सर्व शैक्षणिक विभागाचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/विद्यापीठ संचालित कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र, औषधशास्त्र, वास्तुशास्त्र, अभियांत्रिक व विधी महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठाच्या दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक आणि संचालक

<u>प्रत माहितीसाठीः–</u>

१. मा. कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
२. मा. प्र–कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
२. कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
३. संचालक BCUD यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०००३२.
४. सर्व उपकुलसचिव, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.
५. सर्व सहाय्यक कुलसचिव, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, विद्यानगरी, मुंबई – ४०००९८.